दैनिक
# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक ३०१ शुक्रवार दि.३० मे २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## शेतकरी तुम्हाला बांधावर गाडल्याशिवाय राहणार नाही; विजय वडेट्टीवार यांची सरकारवर टीका

नागपूर : महाराष्ट्रात सध्या सर्वत्र पावसाळी वातावरण निर्माण झाले आहे. तसेच अनेक भागांमध्ये पावसाने विक्राळ रूप धारण करत शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. मुंबई पुणे सारख्या जिल्ह्यांना देखील पावसाने चांगलेच झोडपून काढले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया देत महायुती सरकारवर टीका केली आहे. वडेट्टीवार पुढे म्हणाले, अद्यापही कोणता मंत्री, नेता, आमदार यांना शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांची व्यथा ऐकण्यासाठी वेळ नाही. यांना केवळ राजकारण करायचे आहे. यांना केवळ सत्ता आणि खुर्ची महत्त्वाची आहे. काल मी विखे पाटील पाहिले. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी देखील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करायला पाहिजे. अवेळी पाऊस वगैरे हे एनडीआरएफच्या निकषात बसत नाही, मी त्या खात्याचा मंत्री होतो. पण राज्य सरकार म्हणून एचडीआरएफचे निकष आहेत त्याप्रमाणे त्यांनी मदत करण्याची आवश्यकता आहे. केवळ तोंडाला पाने पुसण्याचे काम करू नका. आम्ही हे करतो, ते करतो



म्हणत बसू नका. नाहीतर शेतकरी नगरपंचायतीच्या निवडणुकीत तुम्हाला बांधावर गाडल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराच त्यांनी दिला आहे. हे केवळ हिंदू मुस्लिम करत राहतात वडेट्टवार म्हणाले, थोडी देखील शेतकऱ्यांची कीव नाही यांना. एवढे मोठे संकट आलेले असताना सुद्धा त्यांना मदतीची घोषणा नाही. थातुरमातूर पंचनामे केले जात आहेत. धान उत्पादक शेतकरी पूर्ण उद्ध्वस्त झाला आहे. रब्बी पिकाचे सर्व धान अजूनही खरेदी केंद्र सुरू केले नाहीत. त्यांना परवानगी नाही. आम्ही सातत्याने मागणी करत आहोत, पण त्याकडे दुर्लक्ष होत आहे. या सरकारला काहीच दिसत नाही. हे केवळ हिंदू मुस्लिम करत राहतात आणि जनता गेली खड्ड्यात. याच्या पलीकडे यांना काही देणे-घेणे नाही. हिंदू मुस्लिम करून यांना मते मिळतात, असेही ते म्हणाले.

## वर्षभरात देशात झालेल्या परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्राचा ४० टक्के हिस्सा; मुख्यमंत्री फडणवीसांकडून आकडेवारी जाहीर

मुंबई : महाराष्ट्रातील उद्योगधंदे इतर राज्यात जात आहेत अशी टीका सतत महायुती सरकारवर केली जात आहे. यादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक आनंदाची बातमी दिली आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले देशाने वर्षभरात आकर्षित केलेल्या एकूण गुंतवणुकीपैकी ४० टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली आहे. तसेच, गेल्या वर्षी महाराष्ट्राने आकर्षित केलेल्या एकूण गुंतवणुकीपेक्षा यंदा राज्यात ३२ टक्क्यांनी अधिक गुंतवणूक झाली आहे.



काय म्हणाले देवेंद्र फडणवीस? महाराष्ट्रात गेल्या वर्षात झालेल्या गुंतवणुकीशी तुलना केली तर यावर्षी त्यापेक्षा ३२ टक्के अधिक गुंतवणूक आली आहे. या शेवटच्या तिमाहीत २५,४४१ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत हे वर्ष गेल्या १० वर्षांतील रेकॉर्ड स्थापित करणारे वर्ष ठरले. अर्थात हा रेकॉर्ड आपण पहिल्या ९ महिन्यातच मोडला होता. या विक्रमी कामगिरीसाठी मी महाराष्ट्रातील जनतेचे अतिशय मनापासून अभिनंदन करतो. माझे सहकारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि मंत्रिमंडळाच्या नेतृत्त्वाखाली आपल्या महाराष्ट्राची ही घौडदौड ही अशीच कायम राहील असे देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.

## ट्रम्प यांचा हार्वर्डला पुन्हा इशारा : म्हणाले, विदेशी विद्यार्थ्यांची संख्या १५% पर्यंत मर्यादित करा

अमेरिकेतील प्रसिद्ध हार्वर्ड विद्यापीठ हे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या प्रशासनाचे सतत लक्ष्य बनत चालले आहे. विद्यापीठाच्या बाबती रोज नवनवीन निर्णय ट्रम्प प्रशासन घेत असल्याचे दिसत आहे. त्यात काही दिवसापूर्वी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी हार्वर्डला त्यांच्या प्रशासनाच्या नियमांचे पालन करावे लागेल असा कडक संदेश दिला होता. त्यानंतर आता पुन्हा एकदा ट्रम्प यांनी हार्वर्ड विद्यापीठाला आदेश दिले आहेत. यात त्यांनी वीयडपीठातील विदेशी विद्यार्थ्यांच्या संख्येविषयी सूचना केल्या आहेत.

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी विद्यापीठाला दिलेल्या नवीन सूचनेत त्यांनी,हार्वर्डमध्ये शिकणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांची संख्या १५ टक्क्यांपर्यंत मर्यादित करावी लागेल असे कडक शब्दात सूचित केले आहे. त्यांच्या या आदेशानुसार अमेरिकन विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणे सोपे होईल असे सरकारचे म्हणणे आहे. दरम्यान, विद्यापीठाने परदेशी विद्यार्थ्यांची संपूर्ण यादी सरकारला सादर करावी, अशा सूचना देखील करण्यात आल्या असल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, व्हाईट हाऊसच्या ओव्हल ऑफिसमध्ये माध्यमांशी बोलताना ट्रम्प यांनी, ‘हार्वर्डने परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर १५% मर्यादा घालावी. तसेच, हार्वर्ड प्रशासनाने परदेशी विद्यार्थ्यांची सध्याची यादी सरकारला सोपवावी. हार्वर्ड प्रशासनाने आता सुधारणा करायला हवी. विद्यापीठ आपल्या देशाशी खूप अनादराने वागत आहे. तसेच दररोज स्वतःला अडचणीत आणत आहे.असे म्हटले आहे, पुढे बोलताना ट्रम्प यांनी,आमच्याकडे बरेच स्थानिक विद्यार्थी आहेत जे हार्वर्ड आणि इतर संस्थांमध्ये जाऊ इच्छितात, (परंतु) आमच्याकडे खूप परदेशी विद्यार्थी असल्याने त्यांना प्रवेश मिळू शकत नाही. मला वाटतं परदेशी विद्यार्थ्यांसाठी मर्यादा ३१ टक्के नसून १५ टक्क्यांच्या आसपास असावी. मला हार्वर्ड पुन्हा एकदा उत्तम हवे आहे. अशी इच्छा त्यांनी यावेळी व्यक्त केली. याशिवाय, ट्रम्प म्हणाले की,हार्वर्डला दिले जाणारे पैसे अशा ट्रेड स्कूलमध्ये गुंतवावेत जे लोकांना प्लंबिंग आणि इलेक्ट्रिकल वर्क सारखे कौशल्य शिकवतात.

## लाडक्या बहिणींसाठी पुन्हा आदिवासी विभागाचा निधी वळवला; मंत्री अशोक उईके संतापले, म्हणाले, ‘हा अपप्रचार थांबवा’

मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी निधी वर्ग करण्यास होणाऱ्या विरोधाला न जुमानता राज्य सरकारने पुन्हा आदिवासी विकास विभागाचा निधी वळविण्याचा निर्णय घेतला आहे. लाडक्या बहिणींच्या खात्यात मे महिन्याचे दीड हजार रुपये लाभ जमा करण्यासाठी आदिवासी विभागाचा ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी वळवण्यात आला आहे. याआधी देखील दोन वेळा आदिवासी विभागाचा ३३५ कोटी ७० लाखाचा निधी वर्ग करण्यात आला होता. आता तिसऱ्यांदा अदिवासी विभागाचा ३३५ कोटी ७० लाखांचा निधी वर्ग करण्यात आला आहे. यावर आता राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आदिवासी विकास विभागाच्या योजना पूर्ण होण्यात कुठलीही अडचण नाही, त्यामुळं आमचा निधी कमी केला हा अपप्रचार थांबवला पाहिजे असे मत मंत्री अशोक उईके यांनी




# संपादकीय

## चीन हाच खरा शत्रू

शांततामय संबंध राहण्यासाठी भारत आणि चीनमध्ये २९ एप्रिल १९५४ रोजी बीजिंगमध्ये पंचशील करार केला. यामध्ये शांततामय सहजीवनाच्या पाच मूलभूत तत्त्वांचा समावेश असल्यामुळे त्याला 'पंचशील' संबोधले गेले. उभय देशांची प्रादेशिक एकात्मता आणि सार्वभौमत्वाचा आदर, परस्परांच्या अंतर्गत व्यवहारांत हस्तक्षेप न करणे, परस्परांचे हितरक्षण आणि शांततामय सहजीवन या तत्त्वांचा त्यात समावेश होता. 'हिंदी-चिनी भाई भाई' घोषणा कमालीची लोकप्रिय ठरली. १९४९ मध्ये माओत्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली चीनमध्ये क्रांती घडून चँग के शेक यांचे सरकार उलथवले गेले. तेव्हाही भारताने या नव्या कम्युनिस्ट सरकारसोबत मैत्री ठेवली होती.

चीनला मान्यता देणारा आशियातील भारत हा पहिला देश होता. भारताने १ एप्रिल १९५० रोजी चीनला मान्यता दिल्यानंतर इंडोनेशिया, ब्रह्मदेश (म्यानमार) आदी आशियातील देशांनी त्याला मान्यता दिली. संयुक्त राष्ट्रसंघात चीनला सदस्यत्व देण्याच्या प्रस्तावाला भारताने समर्थन दिले होते. बांडुंग येथे झालेल्या आशियाई परिषदेत चीनला सहभागी करून घेण्यातही पुढाकार घेतला होता. अशाप्रकारे चीनला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थान मिळावे, यासाठी भारताने खास प्रयत्न केले होते. या पार्श्वभूमीवर ऑक्टोबर १९५० मध्ये चीनने तिबेटवर आक्रमण करून कब्जा घेतल्याने भारताला धक्का बसला. कारण, भारताचे जसे चीनसोबत स्नेहपूर्ण संबंध होते, तसेच तिबेटसोबतही, तरीही तिबेटवरून चीनविरुद्ध संघर्षाचा पवित्र न घेता नेहरूंनी संयमाचे धोरण स्वीकारले.

१९५४ ते १९५६ या काळात नेहरू आणि चीनचे पंतप्रधान यांनी एकमेकांच्या देशांचे दौरे करून 'पंचशील'चा पुरस्कार केला; पण १९६२ मध्ये सीमा तंट्यावरून चीनने भारतावर आक्रमण करून पंचशील तत्त्वाची पायमल्ली केली, तेव्हा चीन किती विश्वासघातकी आहे, याचा प्रत्यय आला. पाच वर्षांपूर्वीही चीनने गलवान खोर्यात घुसखोरी केली. अरुणाचल प्रदेशला चीन सतत आपल्या नकाशात दाखवत असतो. आता भारत हा चीनला मुख्य शत्रू मानतो व पाकिस्तानकडे सुरक्षाव्यवस्थेपुढील प्रमुख धोका म्हणून पाहतो, असे निरीक्षण अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणेच्या जागतिक अहवालात नोंदवले आहे. 'वर्ल्डवाईड थ्रेट असेसमेंट रिपोर्ट २०२५' अहवालात भारतासाठी पाकिस्तान ही दुय्यम सुरक्षा समस्या आहे आणि चीन हाच भारताच्या दृष्टीने प्रमुख शत्रू आहे, असे म्हटले आहे.

भारत-पाकिस्तानात मे महिन्यात संघर्ष झाला असला, तरीही भारताच्या दृष्टीने पाकिस्तान त्याचा दुय्यम शत्रू असून, त्याला शिरजोर होऊ न देणे आवाक्यात आहे, असे भारत मानतो. २०२० पासून भारत आणि चीनमध्ये गलवान सीमेवर सुरू झालेला संघर्ष अद्याप संपलेला नाही. हिंदी महासागर क्षेत्रातील चिनी प्रभाव रोखण्यासाठी भारत प्रयत्न करील. चीनच्या वाढत्या प्रभावाला पायबंद घालण्यासाठी हिंदी महासागर क्षेत्रात द्विपक्षीय संरक्षण भागीदार्या करण्यास आणि वैश्विक नेतृत्व म्हणून स्वतःला सिद्ध करण्यास भारत प्राधान्य देत आहे, अशी नोंद अमेरिकेच्या गुप्तचर संस्थेच्या या अहवालात करण्यात आली आहे. चीनला प्रतिशह देणे आणि लष्करी सामर्थ्यात वाढ करणे यावर येत्या काही वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी भर देतील, हा या अहवालातील अंदाज योग्यच म्हणावा लागेल.

चीनकडे ६००पेक्षा जास्त अण्वस्त्रे आहेत आणि येत्या पाच वर्षांत ही संख्या हजारवर जाईल. यातील बहुतेक अण्वस्त्रे तत्काळ वापरासाठी सज्ज असतील. चीन हा पाकिस्तान आणि उत्तर कोरियाला अण्वस्त्रे व क्षेपणास्त्रे बनवण्यासाठी मदत करत आहे. भारत आणि पाकिस्तानकडे प्रत्येकी १७०च्या आसपास अण्वस्त्रे आहेत. पाकिस्तान दिवाळखोर बनला असला, तरीही चीनकडून भीक मागून तो विनाशकारी शस्त्रे खरेदी करत आहे. भारताने संयुक्त राष्ट्रात पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मद या संघटनांशी संबंधित पाच दहशतवाद्यांना 'जागतिक दहशतवादी' घोषित करण्यासाठी पाठवलेले प्रस्ताव चीनने पुन्हा रोखले आहेत.

पहलगाम हल्ल्यास जबाबदार असलेल्या द रेझिस्टन्स फ्रंटवर (टीआरएफ) बंदी घालण्याचा भारताचा संयुक्त राष्ट्रातील प्रस्तावही चीनने अडवला आहे. एकीकडे आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवरून जगातील दहशतवाद संपुष्टात आणण्याच्या वल्गना करायच्या आणि दुसरीकडे पाकिस्तानसारख्या दहशतवादी देशाला पाठबळ पुरवायचे, ही चीनची दुहेरी नीती आहे. रशियाचे परराष्ट्रमंत्री सेर्गेई लावरोव गेल्या आठवड्यात म्हणाले होते की, पाश्चिमात्य देश भारत व चीनला एकमेकांविरोधात उभे करून तणाव वाढवत आहेत. पाश्चात्त्यांना एकध्रुवीय जग हवे आहे; पण रशिया आणि चीन पाश्चात्त्य देशांच्या नियंत्रणाखाली राहणार नाहीत.

या देशांचे प्रयत्न जे काही असतील ते असोत; पण चीन हा भारतविरोधी कारवाया करत आहे, हे लावरोव यांना माहीत नाही का? शिवाय चीनचा सामना करायचा असेल, तर भारताला रशियाची मदत होणार नाही. १९६२च्या युद्धात रशियाने भारताला मदत केली नव्हती. आज रशियाच चीनवर बर्यापैकी अवलंबून आहे. १९६२च्या युद्धाची सुरुवात झाल्यानंतर चीनने सोव्हिएत रशियाशी चर्चा केली होती; पण प्रत्यक्ष युद्ध सुरू झाले, तेव्हा सोव्हिएतचे अध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह तटस्थ राहिले होते. याचे स्मरण राम यांनी करून दिले आहे. अशावेळी भारताला अमेरिकेची मदत घेण्याशिवाय पर्याय राहिला नव्हता, तरीही आजही भारत रशियाच्या प्रभावातून बाहेर पडू शकला नाही, असे अमेरिकेला वाटते, तर भारत पाश्चात्त्य देशांसाठी चीनविरोधी प्यादे बनतो आहे, असे रशियाला वाटते.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'जशास तसे' कर धोरणांमुळे चीनला थोडाफार फटका बसेल आणि त्याचा भारताला लाभ होईल, अशी चर्चा आहे. त्यामुळे चीन अस्वस्थ आहे. आता जगातील चौथी अर्थव्यवस्था बनलेल्या भारताने चीनपुढे आव्हान निर्माण केले आहे. पाकिस्तानला हाताशी धरून चीनची कारस्थाने वाढतच जाणार आहेत. म्हणूनच चीनबाबत भारत गेल्या काही वर्षांपासून सावध असून, ते नैसर्गिकच मानावे लागेल. भारत आपल्या चीनविषयक धोरणावर किती ठाम आहे, हेच या अहवालावरून स्पष्ट होते.

# उत्खनन नद्यांचा मुळावर!

सध्या मुसळधार पावसामुळे अनेक नद्यांना पूर आला आहे. मात्र, नद्यांची नैसर्गिक सीमा आणि खोली यात मानवाने हस्तक्षेप केल्यामुळे नद्यांचे अस्तित्व संकटात आहे.

नद्यांना उत्खननाचे ग्रहण लागले आहे. बांधकामासाठी नद्यांचे प्रवाह अडविले किंवा वळविले जात आहे. परिणामी ऋतुचक्र बिघडत आहे. सरकारने मानवी हस्तक्षेपाला पायबंद घालण्यासाठी वेळीच पावले उचलली नाही तर नद्यांचे अस्तित्व संकटात सापडेल. मानवी हस्तक्षेप झाल्यास किंवा कोणत्या ना कोणत्या कारणाने एकाच ठिकाणी साचून राहिल्यास नदी आपला मार्ग बदलते आणि साहजिकच पॅटर्नदेखील बदलतो. नैसर्गिक रूपाने विकसित नदीकाठ हा प्रचंड प्रवाहाला थोपविण्याचे काम करतात आणि नदीकाठची परिस्थिती हाताबाहेर जाणार नाही, याची ते दक्षता घेतात.





साहजिकच नदी एकाच दिशेने वाहत जाते. पुरात नदीचे पात्र वाढते आणि त्याचा गाळ हा सर्वत्र पसरतो. कालांतराने नदीचा प्रवाह कमी होतो तेव्हा नदीकाठ आणि त्याही पलीकडचा भाग अधिक सुपीक होतो. जसे गंगा नदीच्या खोर्यात शेतीयोग्य जमीन तयार झाली आहे. अतिरिक्त पाणी साचविण्यासाठी तयार केलेले तलाव, धरणापर्यंत जाणार्या नद्या 'डेल्टा' होतात आणि त्या जैवविविधतायुक्त पर्यावरण तयार करतात. याचे उदाहरण म्हणजे गंगा-ब्रह्मपुत्रा नदी या डेल्टा आहेत.

ऋतुचक्र सुरू ठेवण्यासाठी पर्यावरणपूरक वातावरण असणे गरजेचे आहे. नदीपासून निर्माण होणारा सर्वात मोठा घटक म्हणजे काठावरची वाळू आणि गाळ. ती एकप्रकारे मोङ्गतच मिळते. प्रामुख्याने बांधकाम क्षेत्रात या घटकाला प्रचंड मागणी आहे. अर्थातच वाळू उत्खननाच्या कामाचे नियमन सरकारच्या अधीन आहे. पण अलीकडच्या काळात बांधकामात होणारी वाढ पाहता देशातील जवळपास सर्वच राज्ये वाळू उत्खननाने त्रस्त झाली आहेत. वनक्षेत्र नसलेल्या भागात नद्यांची व्याप्ती अधिक असल्याने बेकायदा वाळू उत्खनन होत असल्याच्या बातम्या सारख्याच पाहावयास मिळतात आणि त्याचवेळी वाळू तस्करांवर महसूल विभागाकडून कारवाई देखील केली जाते.

मात्र, सध्याच्या काळातील घडामोडी पाहिल्या तर वाळू माङ्गिया आता वनक्षेत्रातही घुसखोरी करू लागले आहेत आणि वन अधिकारी आणि कर्मचार्यांवर हल्लेदेखील होत आहेत. वास्तविक वाळू ही वाळवंटात मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे, परंतु त्याचे कण हे गरजेपेक्षा अधिक गोल असल्याने तसेच र्हास होण्याची शक्यता अधिक असल्याने ती वाळू बांधकामांसाठी निरुपयोगी ठरते. बांधकामातील वाळू टोकदार असायला हवी आणि त्यात खनिजाचे प्रमाण असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. म्हणूनच टणक आणि जाड वाळूचा शोध घेण्यासाठी वाळू तस्कर बराच आटापिटा करत असतात.

वाळूचा बेसुमार उपसा हा नद्यांच्या भौतिक, रासायनिक आणि जैविक घटकांवर परिणाम करतात. म्हणूनच उपशाबाबत नियम करणे अत्यंत आवश्यक आहे. वाळू उत्खननाची अजस्त्र पद्धत आणि गाळातील स्वरूपात होणारा बदल हा नदीकाठ भागावर परिणाम करतो आणि पाण्याची गुणवत्ता ढासळते. सततच्या उत्खननामुळे नदीकाठ कमकुवत होतात आणि प्रवाहदेखील विचलित होतो. धूप आणि गाळ जमा होण्याच्या प्रक्रियेवरही विपरीत परिणाम होतो. या कारणामुळे सभोवताली अनेक दुष्परिणाम पाहावयास मिळतात.

रासायनिक घटकांचा विचार केल्यास वाळू उत्खनन आणि वाहतुकीत मशिनरीचा वापर होत असल्याने पाणी आणि हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. वाळू उपसा करणार्या मशीनमधून बाहेर पडणारा धूर आणि वापरले जाणारे इंधन यामुळे नदीचा नैसर्गिकपणा कमी होत आहे. वाळू काढल्याने गाळातील पोषक तत्त्व नष्ट होत आहेत. ज्या ठिकाणी प्रचंड वाळू जमते, तेथेच उत्खनन केले जाते. साहजिकच नदीकाठ खचण्याचे प्रमाण वाढत जाते. नदीच्या स्थितीचे आकलन केल्यास वाळू, माती आणि गाळ पोषकतत्वानी युक्त असून नदीकाठ समृद्ध आहे. परंतु उत्खननामुळे नदीच्या पाण्यात असणारे पोषकतत्व कमी होत आहे.

नदीपात्रातून सतत वाळूचा उपसा होत असल्याने पाण्यातील सूक्ष्मजीवांचा अधिवास धोक्यात आला आहे आणि वास्तविक हे जीव जैविक आरोग्य सांभाळण्याचे काम करत असतात. साहजिकच नदीचे पर्यावरण ढासळते. सतत वाळू उपसा केला जात असल्याने नदीचे पाणी दूषित होते आणि त्यामुळे सूर्यप्रकाशाची किरणे थेट तळापर्यंत जाताना अडथळे येतात. नदीच्या पाण्यात प्रकाश पोहोचत नाही. त्यामुळे जलजीव नष्ट होतात. जलजीव जसे डायएटम, मॅक्रोइनिवर्टीब्रेट, बेथिक एल्गी आणि माशांची अंडी नष्ट होतात. उथळ आणि अडथळ्यांतून मार्ग काढणार्या पाण्याच्या प्रवाहामुळे माशांच्या विहारात आणि स्थानांतरात बदल होतो. साहजिकच अन्नसाखळी विस्कळीत होते. एका अभ्यासानुसार बेसुमार वाळू उपशामुळे गंगा नदीतील डॉल्फिन आणि चंबळ नदीतील घडियालसारख्या प्रजाती संकटात सापडल्या आहेत. वाळू उपशामुळे जलचर प्राण्यांच्या संख्येत घट झाली आहे आणि पाण्याची गुणवत्ता कमी झाल्याने नदीकाठावर असणार्या वनस्पतींची वाढदेखील खुंटत आहे. यानुसार 'शेअर्ड रिव्हरिन एक्वेटिक हॅबिटाट (एसआरए)चा र्हास होतो. या गोष्टी नदीकाठावर सावली देण्याबरोबरच नदीकाठ स्थिर ठेवण्यास मदत करतात आणि अनेक जीवांना पोषकतत्वही देतात. ऋतूचक्र बिघडत असल्याने महापुराचा अनुभव येत आहे. मानवाने तयार केलेले तलाव हे निसर्गाला अनुरूप असतीलच असे नाही. त्याचा परिणाम म्हणजे पर्यावरणात अनिश्चितता दिसते. त्याचा दूरगामी प्रभाव पडत आहे. पाण्याची गुणवत्ता कमी झाल्याने आणि वाळूच्या खाणीत पाणी साचत असल्याने स्थानिक लोकांचे आरोग्य आणि उपजीविका धोक्यात आली आहे. गुणवत्ता नसलेल्या वाळूचा, मातीचा वापर बांधकामात झाल्यास ते ढासळण्याची शक्यता असते. म्हणूनच महापुरामुळे इमारती कोसळण्याच्या, पूल पडण्याच्या घटना घडतात.

# बेरोजगारीवर उपाय कधी?

बेरोजगारीच्या दरातील चढउतारांचे देशाच्या विकासावर दूरगामी परिणाम होतात. सध्याचा बेरोजगारीचा दर, बेरोजगारीमागील कारणे आणि त्याचे होणारे परिणाम याचा ऊहापोह करणारा लेख

इन्स्टिट्यूट फॉर ह्युमन डेव्हलपमेंट आणि इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन (खङज) यांनी संयुक्तपणे तयार केलेल्या इंडिया एम्प्लॉयमेंट रिपोर्ट २०२४ नुसार, भारताची काम करणारी लोकसंख्या २०११ मध्ये ६१ टक्क्यांवरून २०२१ मध्ये ६४ टक्क्यांपर्यंत वाढली आणि २०३६ मध्ये ती ६५ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.



तथापि, आर्थिक क्रियाकलापांमध्ये सहभागी असलेल्या तरुणांची टक्केवारी २०२२ मध्ये ३७ टक्क्यांपर्यंत घसरली. शाश्वत रोजगार वाढ आणि देशाच्या भविष्यातील समृद्धी सुरक्षित करण्यासाठी सतत दक्षता आणि प्रभावी धोरणात्मक उपाययोजना महत्त्वाच्या आहेत. मागील प्रक्रियेपेक्षा वेगळे पाऊल उचलत, सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने आता मासिक कामगार डेटा अहवाल जारी करण्यास सुरुवात केली आहे, ज्यामध्ये शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागांचा समावेश असेल.

पहिल्या मासिक नियतकालिक कामगार दल सर्वेक्षण मधून असे दिसून आले आहे की एप्रिल २०२५ मध्ये भारताचा बेरोजगारी दर ५.१ टक्के होता. हा आकडा स्वतंत्र थिंक टँक सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी ने मोजलेल्या ७.७३ टक्के दरापेक्षा कमी आहे. दोन्हीसाठी पद्धती भिन्न असल्याने या आकड्यांची तुलना करता येत नाही. झङऋड ने एप्रिल २०२५ मध्ये ७,५११ पहिल्या टप्प्यातील नमुन्याचे युनिट्स विचारात घेतले.

सर्वेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या ८९,४३४ (ग्रामीण भागात ४९,३२३ आणि शहरी भागात ४०,१११) होती आणि सर्वेक्षण केलेल्या व्यक्तींची संख्या ३,८०,८३८ (ग्रामीण भागात २,१७,४८३ आणि शहरी भागात १,६३,३५५) होती. एमओएसपीआयच्या एका प्रसिद्धीपत्रकानुसार, ग्रामीण भागात, १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या व्यक्तींमध्ये एप्रिल २०२५ मध्ये एकूण कामगार दल सहभाग दर (एलएफपीआर) ५५.६ टक्के होता, तर शहरी भागात ५०.७ टक्के होता.

कामगार मागणी आणि रोजगार दरांमधील हे बदलते ट्रेंड सध्याच्या आर्थिक आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि ग्रामीण आणि शहरी भागात शाश्वत वाढ सुनिश्चित करण्यासाठी विचारशील धोरणात्मक उपाययोजनांची आवश्यकता दर्शवितात. अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी आणि देशाच्या आर्थिक लवचिकतेला बळकटी देण्यासाठी आर्थिक क्रियाकलापांमध्ये विविधता आणण्याचे महत्त्व ते अधोरेखित करते. भूतकाळातील भारतातील बेरोजगारी दरावर परिणाम करणार्या प्रमुख आर्थिक घटना आपल्या संपूर्ण आर्थिक इतिहासात, अनेक महत्त्वाच्या घटनांनी भारतातील बेरोजगारी दरावर लक्षणीय परिणाम केला आहे.

जागतिक आर्थिक संकट (२००८-२००९) : २००८ च्या जागतिक आर्थिक संकटाने भारताच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम केला, ज्यामुळे विकास मंदावला आणि विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी कमी झाल्या.

नोटाबंदी (२०१६) : २०१६मध्ये उच्च-मूल्याच्या चलनी नोटा रद्द करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे आर्थिक अडथळे निर्माण झाले, विशेषतः अनौपचारिक क्षेत्रात, ज्यामुळे नोकर्या गेल्या.

वस्तू आणि सेवा कर (२०१७): जीएसटी लागू करण्याचा उद्देश कररचना सुलभ करणे होता, परंतु सुरुवातीला त्याचा अर्थव्यवस्थेत अल्पकालीन व्यत्यय आला, ज्यामुळे व्यवसाय आणि रोजगार प्रभावित झाले.

कोविड-१९ महामारी (२०२०): कोविड आणि त्यानंतरच्या लॉकडाऊन उपायांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर खोलवर परिणाम झाला, ज्यामुळे व्यवसाय बंद पडल्याने बेरोजगारी वाढली.

महागाईचा दबाव : गेल्या काही वर्षांत भारताला महागाईच्या दबावाचा सामना करावा लागला आहे, ज्यामुळे भारतातील सध्याच्या बेरोजगारी दरावर परिणाम झाला आहे. उच्च महागाई दर ग्राहकांची क्रयशक्ती कमी करू शकतात, ज्यामुळे वस्तू आणि सेवांची मागणी कमी होऊ शकते. याचा व्यवसायांवर तीव्र परिणाम होऊ शकतो. परिणामी खर्च कमी करण्याचे उपाय केले जाऊ शकतात, ज्यामध्ये टाळेबंदी आणि नोकरभरती बंदचा समावेश आहे, त्यामुळे बेरोजगारीचा दर वाढतो.

भारतातील बेरोजगारीची कारणे

बेरोजगारी ही कामगार संख्येत घट झाल्यामुळे किंवा नोकर्यांच्या कमतरतेमुळे येते की ती तात्पुरती किंवा कायमची असेल हे ठरवते. बेरोजगारीचे चार प्रकार आहेत- संरचनात्मक, घर्षणात्मक, हंगामी आणि चक्रीय. सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळेही बेरोजगारीत वाढ होते. अकुशल मनुष्यबळ : कमी शिक्षण तसेच व्यावसायिक कौशल्य नसलेल्यांची संख्या मोठी आहे. नोटाबंदीनंतर कामगार-केंद्रित उद्योगांना खासगी गुंतवणुकीत मंदी आहे. कृषी क्षेत्रातील उत्पादकता कमी असल्याने आणि कृषी कर्मचार्यांसाठी पर्यायांच्या कमतरतेमुळे तीन क्षेत्रांमधील संक्रमण आव्हानात्मक आहे. कायदेशीर अडचणी, अपुरा सरकारी पाठिंबा आणि कमकुवत बाजारपेठ, आर्थिक आणि पायाभूत सुविधांशी असलेले संबंध खर्च आणि अनुपालनाच्या अतिरेकीमुळे त्या कामकाजांना फायदेशीर ठरत नाही.

उत्पादन क्षेत्रातील कमी गुंतवणूक, अपुरा पायाभूत सुविधांचा विकास यामुळे दुय्यम क्षेत्रातील नोकरीच्या संधी मर्यादित होतात. सरकार रोजगार स्थिरता निर्माण करण्यासाठी किमान वेतन पातळीवर पूर्णवेळ रोजगार निर्माण करणारा सार्वजनिक रोजगार कार्यक्रम उभारू शकते किंवा कामासाठी अन्न कार्यक्रमाचा भाग म्हणून बेरोजगार व्यक्तींना तात्पुरते कामगार देऊ शकते.

बेरोजगारीचे निर्धारक : कामगार दलात स्वयंरोजगार वाटा व बेरोजगारी दर यांच्यात नकारात्मक संबंध आहे, जो सूचित करतो की उच्च स्वयंरोजगार असलेल्या राज्यांमध्ये बहुतेकदा अनौपचारिक,बेरोजगारी दर कमी आहेत. शहरीकरण आणि शेतीचा परिणाम: गोवा आणि केरळसारख्या उच्च शहरीकरण झालेल्या राज्यांमध्ये उच्च बेरोजगारी दिसून येते, तर उत्तर प्रदेश, झारखंड, मध्य प्रदेश सारख्या मोठ्या ग्रामीण क्षेत्र असलेल्या राज्यांमध्ये बेरोजगारी दर कमी आहेत. शिक्षण आणि रोजगार: केरळसारख्या उच्च शिक्षण पातळी असलेल्या राज्यांमध्ये बेरोजगारी जास्त आहे, तर गुजरात आणि महाराष्ट्रासारख्या कमी पदवीधर टक्केवारी असलेल्या राज्यांमध्ये बेरोजगारीचा दर कमी आहे. उच्च वेतनाच्या नोकर्या शोधणार्या पदवीधरांमुळे, कौशल्यांमध्ये जुळत नसल्यामुळे किंवा नवीन पदवीधरांना सामावून घेण्यासाठी अपुरी आधुनिक क्षेत्रातील वाढ यामुळे ही तफावत असू शकते.

# संघर्ष प्रस्थापितांच्या विरोधात, न्याय गरिब जनतेला, संवेदनशील आमदार रमेशआप्पा कराड

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आ. रमेशआप्पा कराड यांचा आज वाढदिवस त्या निमित्ताने खुप खुप शुभेच्छा. तसं पहाता हा दिवस स्वत:च्या जीवनात आत्मचिंतन करण्यासाठी म्हणुन देखील ओळखल्या जातो. मागे वळुन पहाताना आप्पांचं आयुष्य त्यात राजकिय संघर्ष आणि समाजात जीवन जगताना अंगी असलेली संवेदनशीलता खर्या अर्थाने नोंद घेण्यासारखी. लातूर जिल्ह्याच्या राजकारणात प्रस्थापितांच्या विरोधात रस्त्यावर उतरून संघर्ष मग त्यात कुठलीही तडजोड नाही. त्यातून गोरगरिब जनता तथा ऊस उत्पादकांना न्याय मिळवुन देण्याची आस म्हणुनच जातीपातीच्या भिंती ओलांडून स्वकर्तृत्वाने रेणापूर विधानसभेचं नेतृत्व जनतेनं त्यांना बहाल केलं. स्वभाव मितभाषी, शांतताप्रिय आणि सकारात्मक भुमिका रक्ताच्या नात्यापेक्षाही मैत्रीचे नाते श्रेष्ठ असते हे त्यांनी आपल्या वर्तणुकीतुन दाखवुन दिलं. म्हणुन त्यांच्यावर ग्रामीण भागातील अठरापगड जातीधर्माचे लोक प्रचंड प्रेम करतात हे नक्की.

रमेशआप्पा यांची वयाची ५८ वर्षे पुर्ण झाली. साठीकडे जाताना त्यांच्यातल्या सकारात्मक भुमिकेचा गुणात्मकदृष्ट्या निश्चित विचार करायला हवा. रामेश्वर त्यांचं मुळ गाव पण कर्मधर्म संयोगाने लातुर शहरात स्थायिक झाले. एमआयटी वैद्यकिय महाविद्यालयाच्या सर्वांगिण विकासात सिंहाचा वाटा निश्चितच राहिला. समाज आणि अध्यात्मिक कार्याची लहानपणापासून सवय कारण कराड कुटुंब हे वारकरी संप्रदायाचे पाईक म्हणुन वंश परंपरेने पुढे चालत आलं. कै. प्रयाग आक्का आणि विश्वशांतीचे प्रणेते डॉ.विश्वनाथ कराड यांच्या छत्राखाली आप्पांच्या जीवनाची झालेली घोडदौड नेत्रदीपकच म्हणावी लागेल. राजकारणात माणुस मोठा होतो पण सहज होतो असे नव्हे. त्याला सोन्याचा चमचा तोंडात घेवुन जन्माला आलेली पिढी पाहिजे. यांच्या नशिबात हे कधीच नाही. जिल्ह्याच्या राजकारणात प्रवेश केल्यापासुन राजकिय संघर्ष कमालीचा करावा लागला. सुरूवातीला शरदचंद्रजी पवार यांच्याही नेतृत्वाखाली काम केलं पण स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्याशी जिव्हाळा झाल्यापासुन भाजपात सक्रियपणे मागच्या २५ वर्षापासुन काम करतात. ज्या लातुरला स्व.विलासराव देशमुख यांच्या राजकारणाचा वारसा तोच प्रस्थापित वारसा दुसरी पिढी चालवते. पण या प्रस्थापितांच्या विरोधात संघर्ष करण्यात आप्पा मागे कधीच राहिले नाहीत. रस्त्यावर उतरून त्यांनी देशमुख प्रस्थापितांच्या विरोधात राजकिय लढाया मग आंदोलन असतील किंवा वेगवेगळ्या भुमिका असतील, संघर्षाच्या मागे गरिबांना न्याय मिळवून देणं हाच त्यांचा उद्देश होता. ऊस उत्पादकांची मुस्कटदाबी किंवा सामान्य जनतेसाठी बंद असलेला राजकिय दरबार हे सारं आप्पांच्यामुळे न्यायप्रविष्ठ झालं. आमदार व्हावं हे त्यांचं स्वप्न त्यासाठी रेणापुर – लातूर ग्रामीण भागात जनसंपर्क सातत्य ठेवला. तसं पहाता तीन वेळा विधानसभेची निवडणुक लढवली. एकदा तर पक्षानं उमेदवारी दिली नाही म्हणुन २७ हजार नोटाला मतं मिळाली. भाजपात एकनिष्ठता ठेवुन त्यांनी संघटनात्मक काम संपुर्ण जिल्ह्यात देखील उभारलं. काही वर्षे जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारीही त्यांच्यावर होती. जिल्हा बँक असो किंवा इतर कुठल्याही निवडणुकीत प्रत्यक्ष लढाईच्या मैदानात हे नेतृत्व नेहमीच अग्रेसर राहिलं. २०१९ मध्ये भाजपाने विधान परिषदेवर त्यांना संधी दिली. त्या संधीचे सोने करताना आपल्या मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर विकासाची कामे त्यांनी केली.



आमदार नसतानाही त्यांच्याकडे होणारी गर्दी आणि सामान्य जनतेच्या अपेक्षा पुर्ण करण्याचं व्यासपीठ म्हणुन देखील पहाण्यात आलं. विधान परिषद आमदार असताना याच मतदारसंघातील ग्रामीण तथा शहरी रस्ते वेगवेगळ्या माध्यमातुन चांगले केले. मुलभुत गरजा पुर्ण करणारा लोकप्रतिनिधी अशी त्यांची ओळख. राजकारणात राजा तशी प्रजा कारण तेच संस्कार समाजावर पडतात. त्यांचा चेहरा सामाजिक कार्याचा आणि वसा वारकरी संप्रदायाचा खरं पहाता या मतदारसंघात वारकरी संप्रदायाची मांदीयाळी त्यांनी उभी केली. भक्तीभाव जोपासण्यासाठी गावागावात आमदार निधीतुन त्यांनी जवळपास नाही म्हटलं तरी ४०० गावात सामाजिक सभागृह धार्मिक मंदिराच्यासमोर देवुन हिंदुत्वाची कास अधिक पक्की केली. दरवर्षी वाढदिवसाच्या निमित्ताने विविध सामाजिक उपक्रम हाती घेताना वृक्ष लागवड हा त्यांचा अजिंडा मतदारसंघात चर्चेचा ठरला. कारण घरोघरी झाडे लावा यासाठी त्यांनी स्वखर्चातुन अनेकदा रोपं देवुन प्रोत्साहित केले. ग्रामीण भागात गावागावात वारकरी संप्रदाय टिकावा यासाठी भजनीमंडळाला लागणारे साहित्य ज्यामध्ये टाळ, मृदंग, वीणा वाटपही वर्षानुवर्षे करत आले. गणपतीच्या उत्सवात प्रत्यक्ष गणपती वाटपाचे कार्यक्रमही त्यांनी घेतले. स्वत:च्या रूग्णालयामार्फत गोरगरीब जनतेची होणारी सेवा खरं तर ईश्वर सेवाच समजावी. एमआयटी हे रूग्णालय केवळ लातुर ग्रामीण नव्हे तर संपुर्ण जिल्ह्यासाठी वरदान असुन गोरगरिब रूग्णांना उपचार दिले जातात. रूग्णालयाच्या मार्फत नियमित मोफत मोतीबिंदु ऑपरेशन, रक्तदान शिबीरं, शिवाय अन्य आरोग्य शिबीरं सातत्याने होत असतात. मुळात आप्पाचा स्वभाव हा संवेदनशील असुन सामाजिक मानवतावादाच्या भुमिकेत परोपकार धर्माने सतत पुण्यकर्म त्यांच्या हातुन घडतच असतं. गोरगरिबांच्यासाठी धावुन जाणं, त्यांच्या सुखदु:खात मिसळुन रहाणं हे सातत्य त्यांनी मागच्या तीस वर्षापासुन बाळकडू पिल्यासारखंच. राजकिय पुढार्याचं ह्रदय फारसं स्वच्छ असावं असं नाही?वर्तमानकाळात तर पुढारी म्हटलं की स्वार्थी, ढोंगी, नाटकी सार्याच गोष्टी पहायला मिळतात. पण आप्पासारखा लोकप्रतिनिधी ज्यांच्या पोटात कुणाविषयी द्वेष नाही. सुडाचा भाव नाही. माझी जनता, माझी माणसं त्यातुन जोपासला जाणारा माणुसकीचा ह्रदय भाव बरंच काही सांगुन जातो. आप्पा म्हणजे आशेचा किरण त्यांचा २४ तास दरबार चालु असतो. म्हणुन सामान्य माणुस सहज भेटण्यासाठी त्यांच्याकडे येतो, त्या अपेक्षाची १०० टक्के पुर्तता करण्याचा प्रयत्न त्यांचा नेहमीच असतो. प्रसिद्ध उद्योगपती जगदीश कुलकर्णी म्हणाले की, आप्पा म्हणजे दिलदार मित्र याचं उत्तम उदाहरण होय. नात्याच्या पलीकडे जावुन मैत्री कशी जपावी? त्यांच्याकडून पहायला मिळतं. प्रशासनाच्या सोबत समन्वय ठेवायचा, विकासाची कामे करताना पाठपुरावा करायचा आणि आपल्या मतदारसंघात कामं कशी मार्गी लागतील? यावर त्यांचा विशेष भर असतो. पाटीलकीचा तोरा त्यांच्या स्वभावात अजिबात नाही. सहज उपलब्धता आणि सुसंवाद हे सद्गुण त्यांच्याकडे पहायला मिळतात. पक्षात काम करताना संघटनात्मक जबाबदारी आणि त्याची जाणिव शिवाय निष्ठा कशी असते? हे देखील त्यांनी दाखवुन दिली. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना अठरापगड जातीधर्माच्या लोकांना सोबत घेणं त्यांना क्रमप्राप्त वाटतं. राज्याच्या पर्यावरण तथा पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांच्या कुटुंबियांसोबत देखील त्यांचा आंतरिक जिव्हाळा नक्कीच म्हणावा लागेल.दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे कराड कुटुंबाचा गोतवाळा हा गोकुळासारखाच भरलेला असतो. कुटुंब वत्सलता आणि सर्वांच्या सोबत असलेला स्नेह एक आदरयुक्त भाव कुटुंबातील सर्वांचा त्यांच्या प्रती असतो. आप्पा म्हणजे बोलणार नाही पण जनहितवादाची भुमिका कृतीतून कधीच सोडणार नाहीत. २०२४ विधानसभा निवडणुकीत त्यांना उमेदवारी दिली. खरं तर राज्यात सामाजिकीकरण खुप विस्कटलेले असताना या मतदारसंघात आप्पांच्या नेतृत्वाचा उदय म्हणजे जातीपातीपेक्षाही माणुसकी श्रेष्ठ हे मतदारबंधुंनी दाखवुन दिलं. वैयक्तिक सांगायचं झालं तर माझं आणि त्यांचा तीस वर्षांचा स्नेह स्व.गोपीनाथरावजी मुंडे यांच्यामुळेच साध्य झाला. मैत्री आदर्श कशी असावी? आणि नातं कसं जपावं? कराड आणि कुलकर्णी एकत्र कुटुंबाचे आम्ही सदस्य त्यामुळे दोघांच्याही कुटुंबात एकही कार्यक्रम एकमेकांशिवाय पुर्ण होवु शकत नाही. जीवाभाव, बंधुप्रेम लावणारा लोकप्रतिनिधी असं देखील म्हणता येईल. रमाकांत बापु मुंडे नात्याने सासरे असले तरी देखील नातेगोत्याचं नातं न ठेवता एक मित्र म्हणुन बापुसोबत असलेला त्यांचा स्नेह तितकाच महत्वाचा.वाढदिवसानिमित्त परमेश्वराकडे एकच मागणं आहे की समाजाला अशा राजकिय नेतृत्वाची गरज असुन त्यांची प्रकृती खर्या अर्थाने ठणठणीत रहावी हीच आमची सदिच्छा.

स्व .गोपीनाथराव मुंडेचे स्थान आप्पाच्या जिवणात महत्वाचे

रमेशआप्पाच्या जीवनात खऱ्या अर्थाने स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांचे नेतृत्व अत्यंत महत्त्वाचे म्हणून ओळखले जाते स्वर्गीय विलासराव देशमुख यांची आणि मुंडे साहेबांची मैत्री सर्वश्रुत असताना प्रस्थापितांच्या विरोधात संघर्ष करण्यासाठी रमेश आप्पांना मुंडे साहेबांनी बळ दिले त्यांनी साहेबांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय संघर्ष चालू ठेवला आज खऱ्या अर्थाने त्यांना यश मिळाले त्यामागे मुंडे साहेबांची प्रेरणा आणि शिकवण हे नक्कीच आहे आजही साहेबांचा चेहरा जरी आप्पांच्या डोळ्यासमोर आला खऱ्या अर्थाने डोळे भरून आल्याशिवाय राहत नाहीत.

---------------------

– राम कुलकर्णी
मो.९४२२७४२५७७

# संघर्षशील नेतृत्व आ. रमेशअप्पा कराड नीती विकासाची !, बांधिलकी समाजाची !!

लातूर ग्रामीण मतदार संघ हेच माझे कुटुंब या भावनेतून काबाड कष्ट करणाऱ्या शेतकरी, शेतमजूरांच्या घामाचे मोल झाले पाहिजे; सर्व सामान्यांना, गोरगरीबांना त्यांचा न्यायहक्क मिळाला पाहिजे यासाठी आवाज उठवून सतत संघर्ष करणारे भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड हे जनसामान्यांच्या मनातील संघर्षशील नेते निर्माण झाले आहेत. राजकीय युद्धात धनशक्ती विरुद्ध लढताना दोन वेळा पराभव झाला तरी खचून न जाता त्याच उमेदीने पुन्हा दुसऱ्या दिवशीपासून सामान्यांच्या हितासाठी कार्यरत राहिल्याने गेल्या विधानसभा निवडणुकीत बहाद्दर मतदारांनी ग्रामीण मतदारसंघात नवा इतिहास घडवून रमेश आप्पांना विधानसभेत पाठविले. या माध्यमातून खऱ्या अर्थाने जनतेनी जनहितासाठी नेता निवडला. आतापर्यंत त्यांनी आमदारकीच्या माध्यमातून गोरगरीब सर्व सामान्यांच्या डोळ्यातील अश्रु पुसण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केला. मतदार संघातील गावागावात वाडीवस्तीत विकास कामासाठी कोट्यावधीचा निधी मिळवून दिला. सामान्य कार्यकर्त्यांना नेतृत्व करण्याची संधी निर्माण करुन मानसन्मान मिळवून दिला ग्रामीण भागाच्या विकासाची नीती असणारे आणि समाजाशी बांधिलकी ठेवणाऱ्या अशा या अष्टपैलू संघर्षशील नेतृत्वाचा आज जन्मदिवस. राजकिय, सामाजिक आणि आध्यात्मिक कार्य त्यांच्या हातून यापुढील काळातही अखंडपणे होत राहील हीच यानिमित्ताने सदिच्छा !!!...... चंद्रकांत कातळे, रेणापूर.



कोणतीही जात किंवा धर्म माणुसकीपेक्षा मोठा नाही. जातीपातीने कोणाचेही भले झाले नाही वसुधैव कुटुंबकम् या सुत्रानूसार गोरगरीब सर्व सामान्य जनतेसाठी, शेतकरी, शेतमजूर, दिन दुबळ्यांसह कष्टकऱ्यांसाठी विविध प्रश्नावर लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी संघर्ष केला. स्व. मुंडे साहेब यांची काम करण्याची पद्धत सर्व सामान्यांसाठी संघर्ष करण्याची धमक आणि ग्रामीण जनतेशी कायम ठेवलेली नाळ, या कामावर प्रभावित होऊन त्यांच्या संघर्षाचा वारसा घेवून शेतकरी कुटुंबात जन्मलेले रमेशअप्पा कराड यांनी आपल्या भागात राज्यकर्त्यांकडून शेतकऱ्यांसह सर्वसामान्य जनतेची होत असलेली लूट फसवणूक पाहता या समाजाचे काही देणे लागतो ही कर्तव्याची भावना मनात ठेवून त्यांनी राजकारणात पाऊल ठेवले आणि लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्षाचे काम सुरु केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाची जबाबदारी लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी रमेशअप्पा कराड यांच्यावर दिली. लातूर तालुका हा काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. या भागात भाजपाचे काम करणे तसे अवघडच होते, मात्र जिद्दीने जोमाने जिवाभाचे कार्यकर्ते निर्माण करुन त्यांच्या सुख दुःखात सहभागी होऊन प्रस्थापित शक्ति विरुद्ध सतत संघर्ष करत त्यांनी भाजपाचे आणि स्वतःचे अस्तित्व निर्माण केले. लातूर ग्रामीण या मतदार संघात मेहनतीने कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण करुन भाजपाचा बालेकिल्ला निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आ. रमेशअप्पा यांची जिद्द, आत्मविश्वास, चिकाटी आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी अनेकवेळा अनुभवायला मिळाली. मागील दोन विधानसभा निवडणुकीत पराभूत झाले मात्र कधीच खचले नाही. खचले ते आप्पा कसले पराभव झाल्याच्या दुसऱ्या दिवशीपासून पुन्हा त्याच उमेदीने गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या हितासाठी कार्यरत राहीले. अडीअडचणी सोडवू लागले याचा परिणाम गेल्या विधानसभा निवडणुकीत दिसून आला. जनतेनेच ही निवडणूक हातात घेतली आणि धनशक्ती एकाधिकारशाही हुकूमशाही विरुद्ध आवाज उठवून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात नवा इतिहास घडवला रमेश आप्पांना विधानसभेत पाठवले. हक्काचा आमदार निवडून आणला. खऱ्या अर्थाने जनतेने जनहितासाठी नेता निवडला असे बोलले तर वावगे ठरणारे नाही.

काबाड कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांना, शेतमजूरांना कष्टाचा मोबदला मिळाला पाहिजे त्यांच्या घामाचे मोल झाले पाहिजे गोरगरीब सर्वसामान्यांना न्याय हक्क मिळाला पाहिजे यासाठी सोयाबीन अनुदान, अतिवृष्टी नुकसान भरपाई, पिकविमा, दुष्काळी मदत वेळोवेळी विविध प्रश्नांवर अनेक आंदोलने केली, मोर्चे काढले, मेळावा घेवून सरकारला धारेवर धरुन संघर्ष केला आणि न्याय हक्क पदरात पाडून घेतला. मांजरा कारखान्याच्या दारात परिवाराच्या इतिहासात पहिल्यांदाच शेतकऱ्यांना एफआरपी प्रमाणे गाळप केलेल्या ऊसाला भाव मिळावा यासाठी मांजरा कारखान्याच्या दारात आ. रमेशअप्पा कराड यांनी केलेले आंदोलन लक्षवेधी ठरले. या आंदोलनामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना शासनाच्या एफआरपी नूसार भाव मिळाला.

गेल्या पंधरा–वीस वर्षात आ. रमेशअप्पा कराड यांनी भारतीय जनता पार्टीच्या पक्ष वाढीसाठी प्रयत्न केले. पक्षाच्या वतीने दिलेले कार्यक्रम प्रत्येक वेळी यशस्वी केले. मागील काळात झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, रेणापूर नगर पंचायत यासह विविध निवडणुकीत पक्षाला घवघवीत यश मिळवून काँग्रेस पुढाऱ्यांना धुळ चारली आणि सामान्य कार्यकर्त्यांना सन्मानाची पदे मिळवून दिली. मागील विधानसभा निवडणुकीच्या वेळी निवडून येण्याची परिस्थिती असताना युतीच्या जागा वाटपात ठाकरे सेनेने सौदा करून ही जागा स्वतःकडे घेतली तर निवडून येण्याची क्षमता नसल्याने काँग्रेस पुढाऱ्यांनी सौदा करून मतदारसंघ विकण्याचे पाप केले. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता काँग्रेसची ही नीती सर्वसामान्य ओळखली आणि तीस हजार मते नोटाला देऊन नवा उच्चांक केला. विक्रमी नोटाच्या मताची दखल घेऊन आणि आजपर्यंत केलेल्या सर्व कामाची दखल घेवून भाजपा पक्षश्रेष्ठीने रमेशअप्पा कराड यांना विधानभवनात काम करण्याची संधी दिली. रमेशअप्पा आमदार व्हावेत ही गोरगरीब, सर्व सामान्यांची इच्छा यानिमित्ताने पूर्ण झाली. प्रत्येकाला आपल्या हक्काचा माणूस आमदार झाला याचा प्रत्यय प्रत्येकाला अनुभवायास मिळाला. आमदार झाले म्हणून आप्पांमध्ये कुठलाच बदल झाला नाही, बडे जावपणा दिसला नाही. सर्वांना सहजतेने उपलब्ध होणारे आप्पा, खरोखर हक्काचा आमदार रमेशअप्पाच्या रूपाने सर्वसामान्यांना मिळाला आहे.

केंद्रशासन आणि राज्यशासन यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करून लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावात, वाडीवस्तीतील विविध गावच्या विकासासाठी कोट्यावधी रूपयाचा निधी मंजूर करून आणला. या निधीतून गावागावात अंतर्गत रस्त्यांची कामे, नाली बांधकाम, जल–जीवन अंतर्गत पाणी पुरवठा योजना, ग्रामपंचायत इमारत बांधकाम, सभागृह, समाजमंदिर, सभागृह, विविध गावातील धार्मिक स्थळांच्या विकास योजना, पंतप्रधान ग्रामसडक योजना, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, स्मशानभूमी शेड, नदी नाल्यावर पुलांचे बांधकाम, शेतरस्ते, पेव्हर ब्लॉक रस्ते, कंपाऊंड वॉल, शादीखाना यासह अनेक कामांना मंजूरी मिळवून घेतली. त्यातील अनेक कामे पूर्ण झाली आहेत, तर काही कामे प्रगतीपथावर आहेत हे खुप दिलासादायक आहे. मतदार संघातील गावागावात, वाडीवस्तीत आ. रमेशअप्पा कराड यांच्या माध्यमातून विविध मंदिरासमोर बांधण्यात आलेले सभागृह गावकऱ्यांना लक्षवेधी ठरत आहेत. येत्या काळात निश्चितपणे आ. रमेशअप्पा कराड यांच्या हातून विधायक कामे होतील यात शंकाच नाही. कोरोनाच्या संकट काळात आ. रमेशअप्पा कराड यांनी अनेक रुग्णांना मोठा दिलासा दिला, गरजूंना तात्काळ वैद्यकीय सुविधा पुरविली. लातूर ग्रामीण मतदार संघातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालयास सुसज्ज रूग्णवाहिका दिल्या. मतदार संघातील आशा सेविकांसह विविध कोरोना योध्दांना वेळोवेळी सन्मान करून प्रोत्साहन दिले. एकुणच कोरोना काळात आ. कराड यांनी केलेले काम कोणीही कधीही विसरु शकत नाही.

लातूर ग्रामीण मतदारसंघ हेच माझे कुटुंब या भावनेतून काम करत असताना रमेशअप्पांनी शासनाचा विकास निधी मिळवूण देताना, जनहिताच्या विकासाच्या योजना मंजूर करताना गावागावात, वाडीवस्तीत कसल्याही प्रकारचा भेदभाव केला नाही. वैयक्तिक लाभाच्या योजना संपूर्ण मतदार संघात मोठ्या प्रमाणात गरजु लाभार्थ्यांना मिळवूण दिल्या, या ज्याला गरज आहे, जो गरजवंत आहे आणि ज्याच्यासाठी योजना आहे अशांना शासनाच्या योजनांचा लाभ देवून मोठी मदत केली आहे. या सर्व योजना राबवत असताना जात, धर्म, पंथ, गटतट असा भेदभाव केला नाही यातून वसुधैव कुटुंबकम् याचा प्रत्यय दिसून आला.

आध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक कार्यासह राजकारणात सतत अग्रेसर राहून आपल्या कामाचा वेगळा ठसा निर्माण करणारे, गोरगरीब सर्व सामान्यांच्या हितासाठी संघर्ष करणारे, गरजुंना वेळोवेळी मदत करणारे भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यश आले म्हणून कधीच उन्मत झाले नाहीत तर अपयश आल्याने कधीच खचून गेले नाहीत. गोरगरीब जनतेला, अडचणीत सापडलेल्यांना मदत करणे हे तर रमेशअप्पांच्या आवडीची कामे आहेत. अनेकांना शिक्षण, आरोग्य, क्रिडा, उद्योग व्यवसायासाठी मदत करून आधार दिला. मदत करताना कोण कोणत्या जातीचा आहे, धर्माचा आहे. याचा किंचीतही विचार न करता स्वतःच्या खिश्यातून अनेकांना मदत करणारे आ. रमेशअप्पा कराड हे खरोखरच आधारवड आहेत. राजकारण आणि त्यातून मिळालेली पदे स्वताःसाठी नव्हे तर समाजाला उभे करण्यासाठी, अडचणीत, संकटात सापडलेल्यांना मदत करण्यासाठी आहेत. याची जाण आणि भान ठेवून राजकारण समाज संपन्नतेसाठीच आहे हे तत्व अंगीकारून भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी समाजसेवेचे ओझे अखंडपणे वाहून नेत आहेत. सातत्याने अनेकांच्या डोळ्यातून अश्रू पुसण्याची कम करणारे जनसामान्याचे आधारवड आ. रमेश आप्पा कराड यांचा आज ३० मे रोजी जन्मदिवस या निमित्ताने मनःपूर्वक खूप खूप शुभेच्छा. आप्पासाहेबांना निरोगी दीर्घायुष्य लाभो त्यांच्या हातून जनसेवेचे कार्य कायम पणे अखंड घडत राहो हीच आदिशक्ती श्री रेणुका मातेच्या चरणी प्रार्थना......!!!

------------

चंद्रकांत सूर्यकांत कातळे
भाजपा लातूर

# कोरोनाबाबत संपूर्ण जगाला धडकी भरवणारी बातमी; चीनमुळे महाराष्ट्र, भारत, अमेरिका सगळ्यांचीच झोप उडाली



कोरोनाबाबात संपूर्ण जगाला धडकी भरवणारी बातमी सोमर आली आहे. २०२० मध्ये संपूर्ण जगात धुमाकूळ घालणाऱ्या कोरोना व्हायरलसमुळे पुन्हा एकदा जगात दहशत पसरली आहे. जगभरात कोरोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे.
भारतात सक्रिय रुग्णांची संख्या १२०० च्या वर पोहचली आहे. तर, सक्रिय रुग्णांची सर्वाधक संख्या महराष्ट्रातील आहे.
देशभरात कोरोना विषाणूच्या सक्रिय रुग्णांची संख्या १२०० वर पोहोचली आहे. १२ कोरोना रुग्णांचा मृत्यू झाला आहे. महाराष्ट्रात सक्रिय रुग्णांची संख्या ३२५ आहे. त्यापैकी ३१६ रुग्ण एकट्या मुंबईत आहेत. यानंतर केरळमध्ये सर्वाधिक ४३० कोरोना रुग्ण आहेत. मंगळवारी महाराष्ट्रात ६६, कर्नाटकात ३६, गुजरातमध्ये १४, बिहारमध्ये ५ आणि हरियाणामध्ये ३ नवीन रुग्ण आढळले. ईशान्येकडील राज्यातही कोरोनाचे रुग्ण समोर येऊ लागले आहेत. मंगळवारी अरुणाचल प्रदेशात २ महिला कोरोना पॉझिटिव्ह आढळल्या. त्यापैकी एका महिलेला ताप आणि सौम्य खोकला आहे, तर दुसऱ्या महिलेला कोणतीही लक्षणे नाहीत.
मंगळवारी उत्तर प्रदेशातील फिरोजाबादमध्ये ७८ वर्षीय कोरोना पॉझिटिव्ह वृद्धाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. राज्यातील कोविडच्या नवीन प्रकारामुळे हा पहिलाच मृत्यू आहे. याशिवाय महाराष्ट्र, राजस्थान, पश्चिम बंगाल, कर्नाटक आणि मध्य प्रदेशात एकूण ११ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. एकूण मृतांचा आकडा १२ वर पोहोचला आहे.
अमेरिकेत कोविडमुळे दर आठवड्याला ३५० मृत्यू
चीनमधून आलेल्या नव्या सब व्हेरिएंटने धुमाकूळ घातला आहे. भारतात कोरोनाव्हायरसचे रुग्ण गंभीर नसले तरी अमेरिकेत कोविड-१९ ने हाहाकार माजवायला सुरुवात केली आहे. अमेरिकेत दर आठवड्याला ३५० जणांचा मृत्यू कोविड संसर्गामुळे होत आहे. अमेरिकन आरोग्य संस्था सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन नुसार, गेल्या आठवड्यात ३५० नागरिकांचा मृत्यू झाला. ज्यामध्ये बहुतांश उच्च जोखमीच्या गटातील होते. अमेरिकेत कोरोनाव्हायरसचा नवा सब व्हेरिएंट छह्.१.८.१ धुमाकूळ घालत आहे, जो चीनमधून आला आहे.
आता न्यूयॉर्क, कॅलिफोर्निया, वॉशिंग्टन, व्हर्जिनिया यांसह अनेक मोठ्या अमेरिकन शहरांमध्ये हा वेगाने पसरत आहे. जपान, दक्षिण कोरिया, फ्रान्समध्येही हा व्हायरस पोहोचला आहे. यापूर्वी दिलेल्या कोविड लसींची कमी होत जाणारी क्षमता हे यामागील एक कारण मानले जात आहे. जानेवारी २०२१ मध्ये अमेरिकेत दररोज सुमारे २६ हजार मृत्यू झाले होते. चीनसह सिंगापूर, हाँगकाँग, थायलंड यांसारख्या आशियाई देशांमध्येही हा नवा सब व्हेरिएंट वेगाने पसरत आहे.

# केज येथे माळेगाव ते चौंडी पुण्यश्लोक अहिल्यादेवी रथयात्रेचे उत्साहात स्वागत अहिल्यादेवी होळकरांनी समतेचा विचार दिला-प्रा डॉ कुंभारगावे

केज/प्रतिनिधी गेल्या अनेक वर्षापासून नांदेड जिल्ह्यातील माळेगाव येथून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची मूर्ती रथामध्ये घेऊन पायी दिंडी ३१ मे पर्यंत चौंडी ला जात असते या वर्षी या दिंडीचे आगमन बुधवार रोजी दुपारी केज येथे झाले.
केज शहरात नागरिकांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या रथाचे दर्शन घेऊन स्वागत केले .रथयात्रा दिंडीसाठी दुपारी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी ह भ प संभाजी महाराज धुळगंडे,प्रा.डॉ. मुरहरी कुंभारगावे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. कुंभारगावे म्हणाले अहिल्यादेवी होळकरांचे विचार समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत असे मत व्यक्त केले.
अहिल्यादेवीचे विचार सर्वांच्या मनावर रुजले पाहिजेत असे मत ह.भ.प.संभाजी महाराज धुळगंडे यांनी व्यक्त केले
लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचा विचाराचा जागर करत ही दिंडी अहिल्यादेवींचे चे जन्मस्थळ चौंडी येथे ३१ मे रोजी जयंती दिनी पोहोचणार आहे. महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्यासाठी केज शहर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी दर्शना सह प्रबोधन कार्यक्रम घेण्यातआला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नगरसेवक बाळासाहेब गाढवे ,संजय रोडे, सिध्देश्वर गावडे , कृष्णा रोडे, अशोक रोडे,ओम चादर,राजेभाऊ डुकरे, शिवाजी चेपट ,तात्या रोडे, बबलू रोडे बालासाहेब गायके, जयदेव रोडे, पप्पू लांडगे,सुरज चादर ,बालाजी चादर,आबाराव लांडगे,मेघराज गावडे ,रुहिदास गावडे, सुखदेव



लांडगे,शाहादेव सौदागर,डिंगाबर निगुळे, बालासाहेब,भुतकर,रामकिसन सौदागर,सतीष रोडे, प्रभावती अनंत चादर, पार्वती सतीष रोडे,केवळबाई वसंत सौदागर, पुष्पा बाई सुखदेव लांडगे,काशिबाई काशिनात रोडे परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.हनुमंत सौदागर यांनी केले
दर्शन सोहळ्यास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षक की गावगुंड ? शिक्षकासह त्याच्या दोन मुलाने केला दोघांवर कोयत्याने खुनी हल्ला!

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील गुंडागर्दी आणि दादागिरी थांबायचे नाव घेत नसून जिल्हा परिषदेच्या एका वस्तीशाळा शिक्षकाने त्याच्या बदली संदर्भात गटशिक्षणधिकारी यांच्याकडे तक्रार का केली ? या रागातून चक्क शिक्षक आणि त्याच्या दोन मुलांनी तक्रारदार आणि त्याच्या भावावर कोयत्याने वार करून खुनी हल्ला करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. पेशाने शिक्षक असलेल्या गुरुजी कोयता गँग विरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे. तसेच शिक्षकाच्या मुलाच्या तक्रारी वरून सहाजणा विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की, केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील हनुमान वस्ती शाळेवर गोकुळ सारून नावाचे वस्तीशाळा शिक्षक कार्यरत आहेत. त्यांच्या बाबतीत गावकऱ्यांच्या अनेक तक्रारी आहेत. दि. मे रोजी सकाळी ८:३० वा. च्या सुमारास भारत सुदाम चाटे व त्यांचा भाऊ पप्पू चाटे हे दोघे भाऊ वडवणी येथे शेतातील भुईमुगाच्या शेंगा विकण्यासाठी जात होते. ते दोघे मेंढीच्या ओघळात असलेल्या लमाणबाल नावाने ओळखल्या जात असलेल्या भागात आले असता तेथे वस्ती शाळा शिक्षक गोकुळ सखाराम सारुक आणि त्यांचे मुले आप्पाराव गोकुळ सारुक, श्रीकृष्ण गोकुळ सारुक हे हातात कोयता आणि कुऱ्हाड घेवुन आले आणि त्यांना उद्देशून म्हणाले की, तुम्ही त्यांच्या विरुध्द गट शिक्षण अधिकारी केज यांचेकडे बदली करणे बाबत तक्रार अर्ज का दिला ? असे म्हणुन तुम्ही लइ माजलात काय ? असे म्हणुन शिवीगाळ केली. त्या नंतर सहशिक्षक गोकुळ सारुक याने त्याचे हातातील कोयत्याने भारत चाटे मानेवर घाव घालण्याचा प्रयत्न केला. मात्र भारत चाटे यांनिबतो वार चुकविण्याचा प्रयत्न करीत असताना तो वार डाव्या हाताचे मनगटावर लागला. त्या नंतर गोकुळ सारूक याने पप्पू चाटे याच्यावर देखील कोयत्याने वार केला. यात पप्पू चाटे याच्या मनगट आणि मांडीवर वार झाला आहे. या प्रकरणी भारत चाटे यांच्या तक्रारी वरून गोकुळ सखाराम सारुक, आप्पाराव गोकुळ सारुक, श्रीकृष्ण गोकुळ सारुक या तिघा विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर घटनेचा पुढील तपास पोलीस निरिकक्ष वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम हे करित आहेत.




# अधिकारी व पदाधिकारी प्रमाणिक असतील तर सामान्य जनतेचा विकास वेगाने होईल - प्रा ईश्वर मुंडे

किल्ले धारूर/प्रतिनिधि तालुक्यातील आसरडोह येथे मागील पंचवीस वर्षापासून राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी केली जाते. या वर्षी दि.२६ मे २०२५ सोमवार रोजी आसरडोह येथील जयंतीचा रौप्य महोत्सव व पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या त्रिशताब्धी जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे पदावरून बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस चे नेते प्रा.ईश्वर मुंडे म्हणाले की,



लोकशाहीमध्ये जनतेने प्रमाणिक उमेदवाराला आपले बहुमूल्य मतदान देवून विजयी करणे हेच देश कार्य आहे.
अधिकारी व पदाधिकारी प्रमाणिक असतील तर राष्ट्र माता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अपेक्षित सामान्य जनतेचा विकास वेगाने होईल. सद्य स्थितीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा प्रशासकीय कार्याचा वारसा प्रभावीपणे चालवणाऱ्या अधिकाऱ्याला प्रती वर्षी आपल्या समितीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्कृष्ट प्रशासक पुरस्कार देण्यात यावा.या मुळे अधिकारी-कर्मचारी यांचे मनोबल वाढून त्यांच्या हातून जन हिताची कामे अधिक होतील.अशी संकल्पना मांडली.
या संकल्पनेला उपस्थितांनी टाळयाच्या कडकडाटात प्रतिसाद दिला व सन २०२५ चा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ऊत्कृष प्रशासक पुरस्कार धारूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक श्री देवीदास वाघमोडे यांना सर्वानुमते जाहीर करण्यात आला.
लवकरच त्यांना हा पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.
कार्यक्रमास जेष्ठ नेते माऊली तात्या गडदे,सरपंच रविकिरण देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.
या कार्यक्रमात परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा व नवीन नौकरी लागलेल्या कर्मचाऱ्यांचा -हृदय सत्कार करण्यात आले.
आसरडोह येथील जन्मोत्सव कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रसिद्ध वक्ते महेश पिंगळे,ऍड.दत्तात्रय काजगुंडे,माऊली तात्या गडदे, गोविंद शिंदे,महेश बिट्टे,संदीप काजगुंडे,रंजित राठोड, गणेश पिंगळे, विष्णू शिंदे, संतोष काजगुंडे, आकाश शिंदे, उत्तम तरकसे, अंगद पिंगळे, विनायक गडदे, यशवंत धायगुडे, रमेश काजगुंडे, अनंत खडके, पांडुरंग काजगुंडे, बाबुराव देवकते,संतोष झारगड,प्रकाश काजगुंडे यांनी प्रयत्न केले.

# दौंड-इंदोर एक्सप्रेसला अहिल्यादेवी होळकरांचे नाव द्या खा.बजरंग सोनवणेंची केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे मागणी, अहिल्यानगरपर्यंत रेल्वे सुरू करण्यासाठी आग्रह

केज/प्रतिनिधी दौंड-इंदोर एक्सप्रेस गाडीला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक्सप्रेस' असे नाव देण्यात यावे, तसेच या गाडीचा विस्तार अहिल्यानगर (अहमदनगर) पर्यंत करावा, अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान महाराष्ट्र व मध्यप्रदेशासाठी अतुलनिय आहे. त्यांच्या स्मृतीस आदरांजली ठरावी आणि या भागातील प्रवाशांना अधिक सोयीचा रेल्वेमार्ग उपलब्ध व्हावा, हा यामागचा उद्देश आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री



अश्विनी वैष्णव यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, दौंड-इंदोर या रेल्वेगाडीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक्सप्रेस असे नाव देण्यात यावे, अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान महाराष्ट्रासह मध्यप्रदेशसह अनेक राज्यात महत्वपूर्ण आहे. सदरील गाडीला अहिल्यादेवी यांचे नाव दिल्यास सदरील रेल्वेला नवी ओळख मिळेल. सदरील गाडी आता इंदोर ते दौंड अशी चालत आहे. सदरील गाडीचा विस्तार करून अहिल्यानगरपर्यंत करणे आवश्यक आहे. तसे झाल्यास मराठवाड्यातील यात्रेकरू भाविकांना याचा लाभ होईल. पूण्यश्लोक आहिल्सादेवींचे जन्मस्थान आहिल्यानगर जिल्ह्यात आहे. मराठवाड्यातील नागरिकांना थेट इंदोरला जाणे सोपे होईल. सदरील सेवा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जन्म जयंती ३१ मे रोजी येत असल्याने ३० मे २०२५ पासूनच सुरू करावी, यामुळे जन्मदिनानिमीत्त हा सन्मान ठरेल, असेही पत्रात म्हटले आहे.

# मेथी मेळकुंदा गावातील ग्रामस्थांच्या वतीने दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न

उदगीर : उदगीरपासून जवळ असलेल्या कर्नाटकातील भालकी तालुक्यातील मोजे मेथी-मेळकुंदा या गावात शिक्षणाची समृद्ध परंपरा जपणाऱ्या ग्रामस्थांच्या वतीने, गावातील दहावी व बारावी परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. सत्कार सोहळ्याचे मार्गदर्शक महाराष्ट्र राज्य शिक्षण समितीचे राज्य संपर्क प्रमुख किशनराव बिरादार होते. अध्यक्षस्थानी प्राथमिक सहकारी संघ मर्यादितचे अध्यक्ष बाबुराव बिरादार होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये मुख्याध्यापक माधवराव फावडे, लायन्स क्लब इंटरनॅशनल आयटी विभागाचे जिल्हाध्यक्ष अशोक गुरनाळे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त श्रीमती लक्ष्मी म्हेत्रे, व कार्यक्रमाचे संयोजक तुकाराम मोरे उपस्थित होते. उद्घाटनापूर्वी जम्मू-काश्मीर, पहलगाम येथे देशासाठी शहीद झालेल्या जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत सर्व मान्यवरांच्या हस्ते तुळशीच्या झाडाला पाणी घालून कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे गावकऱ्यांतर्फे शाल व हार देऊन स्वागत करण्यात आले. मार्गदर्शन सत्रात किशनराव बिरादार यांनी विद्यार्थ्यांना कठोर मेहनत, प्रामाणिकपणा व शिक्षणाच्या मूल्यांची जाणीव करून देत प्रेरणा दिली. मुख्याध्यापक फावडे सरांनी सातत्यपूर्ण अभ्यासावर भर दिला. अशोक गुरनाळे यांनी तंत्रज्ञान शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. श्रीमती म्हेत्रे यांनी आपल्या अनुभवांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश गावातील सर्व जाती-धर्मांतील विद्यार्थ्यांना सन्मानाने व्यासपीठ देणे, पालकांना शिक्षणाच्या महत्वाची जाणीव करून देणे व एक गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण निर्माण करणे हा होता. कार्यक्रमाचे संयोजक तुकाराम मोरे सरांनी येत्या शैक्षणिक वर्षापासून आई व भावजय यांच्या स्मरणार्थ, दहावी व बारावीमध्ये प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांचे पारितोषिक देण्याची घोषणा केली. सत्कार समारंभात यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, शाल, सन्मानचिन्ह व पहिल्या क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक देण्यात आले. गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांसोबत पालकांनाही गौरवून त्यांचे अभिनंदन केले. महिलांची व मुलींची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन तुकाराम मोरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रघुनाथ बिरादार, दिलीप बिरादार, किशोर कानेगावे, महालिंग स्वामी, शेषेराव बिरादार, मुकेश घोरपडे, तानाजी केदारे, गणपतराव गुरुजी, व्यंकट म्हेत्रे, शिवाजी म्हेत्रे, शिवाजीराव केदारे, मधुसूदन मोरे, संजीवन मोरे, श्याम बिरादार, बाबुराव कुलकर्णी, नंदकुमार कुलकर्णी, मधुकर कानेगावे, व्यंकट बिरादार, व्यंकट रेड्डी, आप्पाराव रेड्डी, भीम रेड्डी, शिवा रेड्डी, संतोष कुंभार, प्रदीप पांचाळ आणि गावातील युवक मंडळ, शिक्षक वर्ग, शेतकरी व समस्त गावकरी यांचे मोलाचे योगदान लाभले. असे प्रसिद्धी प्रमुख अशोक गुरनाळे यांनी कळविले आहे.

# अखिल भारतीय सैनिकी शाळा प्रवेशपूर्व परीक्षेतील पात्र विद्यार्थ्यांचा स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयातर्फे सत्कार

लातूर दि.२९-०५-२०२५ जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय सैनिकी शाळा प्रवेशपूर्व परीक्षा-२०२५ मधील उल्लेखनिय यश संपादन केलेले आहे. त्यामुळे यातील गुणवंत विद्यार्थी अदित्य थोरात व वेदिका शिंदे या विद्यार्थ्यांचा संस्थेचे समन्वयक बापूसाहेब गोरे व मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.



राष्ट्रीय प्रशिक्षण संस्था (एनटीए) मार्फत घेण्यात येणारी ही परीक्षा सैनिकी स्कूल सोसायटीने ठरविलेल्या अभ्यासक्रमावर आधारित असून देशभरातील लाखो विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा असते. स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यलयातील दोन विद्यार्थी देदिप्यमान यश मिळवून सैनिकी स्कूलसाठी पात्र झालेले आहेत. अशा स्पर्धे च्या युगातही स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयातील आदित्य थोरात (२१२ गुण) व वेदिका शिंदे (१७५ गुण) घेऊन यशस्वी झालेले आहेत. त्यांची मेहनत, जिद्द आणि शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांचे मिळालेले मार्गदर्शन याचे हे फलीत आहे.
विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, सचिवा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर, कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, फायनांन्स डायरेक्टर बापूसाहेब गोरे, समन्वयक विनोद जाधव, मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, शिक्षक शितल वाडीकर, श्रीकांत भिसे, सोनाली पाटील यांच्यासह शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचार्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# यशवंतराव चव्हाण पंचायतराज अभियान अंतर्गत लातूर जिल्हा परिषदेला राज्यस्तरीय तृतीय पुरस्कार प्रदान

लातूर, दि. २९ (जिमाका) : यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान २०२५ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरीसाठी लातूर जिल्हा परिषदेला सन २०२२-२३ साठी राज्यस्तरीय तृतीय पुरस्कार प्राप्त झाला. हा पुरस्कार २७ मे २०२५ रोजी मुंबईतील यशवंत चव्हाण प्रतिष्ठाण मंत्रालयात आयोजित गौरव समारंभात प्रदान करण्यात आला.
राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम, प्रधान सचिव एकनाथ डवले यावेळी उपस्थित होते.
जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी आणि उपमुख्य कार्यकरी अधिकारी श्याम वाखर्डे यांनी पुरस्कार स्वीकारला.



सन २०२३-२४ साठी विभागस्तरावर लातूर पंचायत समितीला प्रथम क्रमांक, तर औसा पंचायत समितीला तृतीय क्रमांक मिळाला. यासाठी गटविकास अधिकारी तुकाराम भालके आणि युवराज म्हेत्रे यांना सन्मानित करण्यात आले. तसेच, सन २०२२-२३ साठी नरेंद्रसिंह भिमसिंह चौहान (कनिष्ठ प्रशासन अधिकारी, आरोग्य विभाग) आणि सन २०२३-२४ साठी विश्वास कुंभकर्ण (विस्तार अधिकारी, एकात्मिक बाल योजना, औसा) यांना गुणवंत कर्मचारी म्हणून गौरविण्यात आले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE